सकाळ अॅग्रोवन ५
नांदेड, शनिवार, १५ जून २०२४



नांदेड : पोखर्णी कृषी विज्ञान केंद्राकडून पीक प्रात्यक्षिकासाठी निवड करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना सोयाबीन आणि तूर या वाणाच्या बॅग वितरित करण्यात आल्या.

# पोखर्णी कृषी विज्ञान केंद्राकडून सोयाबीन, तूर बियाणे वितरण

अॅग्रोवन वृत्तसेवा

नांदेड : नांदेड तालुक्यातील पोखर्णी कृषी विज्ञान केंद्राने समूह आद्यरेशिय तेलबिया व कडधान्य पीक प्रात्यक्षिकासाठी निवड करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना सोयाबीन (एमएयूएस-६१२) व तूर (बीडीएन -७१६) या वाणाच्या बॅग वितरित करण्यात आल्या.

पोखर्णी (ता. नांदेड) येथील कृषी विज्ञान केंद्रात गुरुवारी (ता. १३) खरीप मेळावा आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी कृषी विज्ञान केंद्राच्या अंतर्गत अमदुरा, पांगरी, बोरगडवाडी, शहापूर, खैरगाव, किकी, भायेगाव, एकरला, वडगाव, जवळगाव, चिखाली, अंबाडी, डुन्द्रा, मुलझरा आदी गावांतील ४७५ शेतकऱ्यांना समूह आद्यरेशिय तेलबिया व कडधान्य पीक प्रात्यक्षिकासाठी निवड कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. एस. डी. मोरे व वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देविकांत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यात निवड करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना सोयाबीन (एमएयूएस-६१२) व तूर (बीडीएन -७१६) या वाणाच्या बॅग वितरित करण्यात आल्या. या वेळी कृषी विद्या तज्ज्ञ प्रा. संदीप जायभाये यांनी सोयाबीन, तुरीच्या वाणांची माहिती दिली. यात पिकाचे अंतर, खत नियोजन, पाणी व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले. पीक संरक्षण तज्ज्ञ प्रा. माणिक कल्याणकर, डॉ. एस. डी. मोरे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. अलका पवळे पाटील यांनी तर डॉ. महेश अंभोरे यांनी आभार मानले. या वेळी बीज प्रक्रियेसाठी एनपीके, ट्रायकोडर्मा वितरित करण्यात आले.